# प्रेस नोट

| | |
|---|---|
| युनिटचे नाव | लाचलुचपत प्रतीबंधक विभाग बुलडाणा |
| आरोपी लोकसेवकाचे नाव व कार्यालय | श्री. प्रमोद आनंदराव मोहोड वय ४७ वर्ष पद उपकोषागार अधिकारी मोताळा, वर्ग–३ मुळ रा. .कांग्रेस नगर, सुंदरखेड, बुलडाणा जि. बुलडाणा |
| मागणी केलेली लाचेची रक्कम | ६,०००/– रूपये |
| स्विकारलेली लाचेची रक्कम | लाचेचा पहीला टप्पा ३०००/– रूपये |
| घटनास्थळ | कोषागार कार्यालय मोताळा |
| घटना तारीख | ०८.१२.२०२० |

थोडक्यात हकीकत :– यातील तक्रारदार यांचे व त्यांचे इतर तीन सहकारी निदेशक यांचे मानधनांचे २ महीण्याचे बिल काढुन दिल्याचा मोबदला म्हणुन आरोपी लोकसेवक श्री. मोहोड यांनी तक्रारदार यांना त्याचे व त्यांचे इतर तीन सहकारी यांचे मानधनांचे दोन महीण्याचे बिल काढुन देण्याचा मोबदला म्हणुन पंच क्र. १ यांचे समक्ष प्रत्येकी १५००/– रुपये प्रमाणे एकुण ६,०००/– रुपये लाचेची मागणी करीत असल्याबाबत तक्रार अँन्टी करप्शन ब्युरो बूलडाणा घटकाकडे नोंदविली होती.

सदर तक्रारीवरुन आज दिनांक ०८.१२.२०२० रोजी पडताळणी कार्यवाही आयोजीत केली असता लोकसेवक प्रमोद आनंदराव मोहोड पद उपकोषागार अधिकारी मोताळा, वर्ग–३ मुळ कांग्रेस नगर बुलडाणा जि. बुलडाणा यांनी तक्रारदार यांना त्यांचे व त्यांचे इतर तीन सहकारी निदेशक यांचे मानधनांचे दोन महीण्यांचे बिल काढुन दिल्याचा मोबदला म्हणुन पंच क्रमाक १ यांचे समक्ष प्रत्येकी १५००/– रुपये प्रमाणे ६,०००/– रूपये लाचेची मागणी केली व लाच स्विकारण्याची तयारी दर्शविल्याने आज दिनांक ०८.१२.२०२० रोजी रितसर सापळा कार्यवाही आयोजित केली असता लोकसेवक प्रमोद आनंदराव मोहोड पद उपकोषागार अधिकारी, कोषागार कार्यालय मोताळा यांनी पंच क्र. १ यांचेसमक्ष लाचेचा पहीला टप्पा रक्कम ३,०००/– रुपये टेबलाचे ड्रावर मध्ये टाकण्याचे सांगुन लोकसेवक श्री.मोहोड यांनी तक्रारदार यांचेकडुन लाच रक्कम स्विकारुन आरोपी लोकसेवक श्री. प्रमोद आनंदराव मोहोड वय ४७ वर्ष पद उपकोषागार अधिकारी मोताळा, वर्ग–३ रा. कांग्रेस नगर बुलडाणा यांनी आपले लोकसेवक पदाचा गैरवापर करुन स्वत:साठी पैश्याचे स्वरुपातील अर्थिक लाभ मिळवुन लोकसेवक पदाला न शोभनारे गैरवर्तन केल्याने त्यांचे विरुध्द कलम ७ लाच लुचपत प्रतीबंधक कायदा १९८८ संशोधन २०१८ प्रमाणे गुन्हा दाखल करण्याची कार्यवाही सुरु आहे.

सदर कार्यवाही :– १. मा. श्री. विशाल गायकवाड पोलीस अधिक्षक, अँन्टी करप्शन ब्युरो अमरावती
२. मा. श्री. पडघन अपर पोलीस अधिक्षक, अँन्टी करप्शन ब्युरो अमरावती

यांचे मार्गदर्शनाखाली सापळा अधिकारी श्री. श्रीकांत निचळ पोलीस निरीक्षक तथा पोलीस उपअधिक्षक अँन्टी करप्शन ब्यरो बुलडाणा व सापळा पथकातील स्टाफ नापोका. विलास साखरे, पोकॉ विनोद लोखंडे पोकॉ जगदीश पवार व चालक पोकॉ अरशीद शेख यांनी पार पाडली.

शासकीय लोकसेवकाने लाचेची मागणी केल्यास त्याबाबत अँन्टी करप्शन ब्यरो बुलडाणा.कार्यालय दुरध्वनी क्रमांक ०७२६२–२४२५४८ तसेच टोल फ्रि क्रमांक १०६४ यावर संपर्क साधण्याचे आवाहन पोलीस उपअधिक्षक अँन्टी करप्शन ब्यरो बुलडाणा यांनी केले आहे

कार्यालय पोलीस उप अधिक्षक, अँन्टी करप्शन ब्युरो, बुलडाणा

P.I.

(श्रीकांत निचळ)
प्रभारी पोलीस उपअधिक्षक
अँन्टी करप्शन ब्यरो बुलडाणा

Scanned with CamScanner